
M16/MPS931/EE/20160524

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. विभाग A वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.

2. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



A B C D

उत्तराची अयोग्य नोंद



A B C D

उत्तराची योग्य नोंद

3. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.

4. विभाग B वस्तुनिष्ठ विनापर्यायी स्वरूपाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिली आहे.

5. विभाग C हा दीर्घोत्तरी स्वरूपाचा असून आवश्यक तेथे नकाशा व आकृत्या काढणे अपेक्षित आहे.

6. विभाग A साठी प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

7. विभाग B आणि विभाग C साठी उणे गुणपद्धत लागू नाही.

SECTION - A (गुण : 26)

या विभागात एकूण 52 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण याप्रमाणे हा विभाग 26 गुणांचा आहे. या विभागाला 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

1. वुड्रो विल्सन यांनी 1887 मध्ये कोणता शोधनिबंध लिहिला?
   a) Study of Administration
   b) American Federal System
   c) Our Presidential System
   d) Principles of Public Administration

2. लोकप्रशासनाच्या द्वितीय कालखंडाच्या 1927-37 वेळेस Principles of Public Administration या पुस्तकाचा प्रभाव जाणवतो. वरील ग्रंथ कोणी लिहिला?
   a) रॉबर्ट उटाल
   b) मॅस्लो
   c) एल्. डी. व्हाईट
   d) गुलिक व उर्विक

3. पहिली मिनोब्रुक परिषद कधी झाली?
   a) 1988
   b) 2008
   c) 2010
   d) 1968

4. आर्थिक सहयोग विकास संघटनेच्या अहवालाच्या आधारे सुशासनाची किती वैशिष्ट्ये सांगितली आहेत?
   a) 3
   b) 4
   c) 9
   d) 10

5. A Piece Rate System (1895) चे जनक कोण?
   a) मेरी पार्कर फॉलेट b) एफ्. डब्ल्यू. टेलर
   c) जे. डी. मूने d) ल्यूथर म्युलिक

6. हेन्री फेयॉल व्यवस्थापनाची किती तत्त्वे सांगितली?
   a) 10 b) 13
   c) 4 d) 14

7. नोकरशाहीचा जनक कोण?
   a) टेलर b) मॅक्स वेबर
   c) हेन्री ब्रुक d) चार्ल्स बॅबिल

8. हॉयॉर्न प्रयोग कोणी केले?
   a) एल्टन मेयो b) मॅक ग्रेगर
   c) हर्बर्ट सायमन d) मेरी पार्कर

9. मानवी गरजांचे वर्गीकरण कोणी केले?
   a) पीटर ड्रकर b) अब्राहम मेस्लो
   c) वुड्रो विल्सन d) मॅक्स वेबर

10. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना कधी झाली होती?
    a) 1985
    b) 1885
    c) 1785
    d) 1685

11. पहिले सार्वजनिक महामंडळ म्हणून कोणत्या कंपनीचा उल्लेख करावा लागतो?
    a) ईस्ट इंडिया कंपनी
    b) ग्रँड पेनिन्सुलर कंपनी
    c) पनामा रेल्वे कंपनी
    d) सुएझ कॅनॉल कंपनी

12. भारताने कोणत्या शासनपद्धतीचा स्वीकार केला आहे?
    a) अध्यक्षीय
    b) संसदीय
    c) हुकूमशाही
    d) नोकरशाही

13. माहितीच्या अधिकाराचा कायदा केंद्र सरकारने कधी संमत केला?
    a) 2005 b) 2008
    c) 2003 d) 2009

14. प्रशासनाचे सर्व हिशेब तपासण्याचा अधिकार कोणाला असतो?
    a) न्यायमंडळ b) कायदेमंडळ
    c) राष्ट्रपती d) मंत्रिमंडळ

15. 20 व्या शतकात नागरी समाजाचा अत्यंत उत्कृष्टपणे कोणी विश्लेषण केले?
    a) ॲंटोनिओ ग्रॉमस्की b) जेफ्री अलेक्झांडर
    c) जॉर्ज मेंडलीव्हज् d) प्रो. फाचर

16. संघटनेच्या चार P पैकी खालीलपैकी कोणता एक P आहे?
    a) Picture b) Purpose
    c) Production d) Program

17. POSDCORB मधील B काय आहे?
    a) Bureacracy
    b) Building
    c) Budgeting
    d) Bailout

18. POSDCORB मधील CO म्हणजे काय?
a) Co-ordinating
b) Co-operation
c) Coadaptation
d) वरीलपैकी नाही

19. संघटनेच्या चार P पैकी खालीलपैकी कोणता P नाही?
a) Purpose b) Persons
c) Process d) Program

20. प्रशासन कोणाला जबाबदार असते?
a) कायदेमंडळ b) न्यायमंडळ
c) राष्ट्रपती d) पंतप्रधान

21. Shop Management चे जनक कोण?
a) एफ्. टेलर
b) वुड्रो विल्सन
c) मॅक्स वेबर
d) चार्ल्स बॉबेल

22. प्रशासकीय कायद्याचा उगम सर्वप्रथम कोठे झाला?
a) इंग्लंड
b) फ्रान्स
c) अमेरिका
d) बोलिव्हिया

23. प्रशासकीय कायद्यावर कोणत्या ब्रिटिश लेखकाने टीका केली?
a) डायसी
b) जॉर्ज मेकॉले
c) ग्रॅनटिल ऑस्टिन
d) नेल्सन

24. प्रदत्त विधानाचे लेखन कोण करते?
a) कायदेमंडळ
b) कार्यकारी मंडळ
c) न्यायमंडळ
d) वरीलपैकी नाही

25. प्रदत्त विधानामध्ये लवचिकता खूप असते. वरील विधान-
a) योग्य आहे. b) अयोग्य आहे.
c) a व b दोन्ही d) सांगता येत नाही.

26. दुसऱ्या महायुद्धानंतर कोणत्या विषयाच्या अध्ययनाला गती मिळाली?
a) तुलनात्मक प्रशासन
b) प्रदत्त विधान
c) पर्यावरणीय लोकप्रशासन
d) वरीलपैकी नाही

27. 'अर्थशास्त्र' या पुस्तकाचे लेखक कोण?
a) कौटिल्य
b) चार्वाक
c) अजिंक्य
d) चंद्रगुप्त मौर्य

28. भारतात राज्यातील गव्हर्नर (राज्यपाल) ची नेमणुक कोण करते?
a) राष्ट्रपती
b) जनता
c) मुख्यमंत्री
d) उपपंतप्रधान

29. खालीलपैकी स्थायी सभागृह कोणते?
a) राज्यसभा b) लोकसभा
c) विधानसभा d) वरीलपैकी नाही

30. अमेरिकन राज्यव्यवस्थेत किती राज्ये समाविष्ट आहेत?
a) 50
b) 27
c) 100
d) 105

31. प्रशासकीय कायद्याचा उगम कोणत्या राज्यक्रांती नंतर फार जोमाने झाला?
a) फ्रान्स
b) इंग्लंड
c) अमेरिका
d) स्पेन

32. अमेरिकेत अध्यक्ष नेमणुकीसाठी निवडणुका घेतल्या जातात. हे विधान-
a) अयोग्य आहे.
b) योग्य आहे.
c) सांगता येत नाही
d) वरीलपैकी नाही

33. अमेरिकन राष्ट्रपती ____ वर्षांसाठी तर भारतीय ____ वर्षांसाठी निवडला जातो.
a) 9, 5 b) 4, 5
c) 6, 4 d) 2, 3

34. मंत्रिमंडळ व पंतप्रधान सामूहिकरीत्या कोणाला जबाबदार असतात?
a) कायदेमंडळ
b) न्यायमंडळ
c) कोणालाही नाही
d) राष्ट्रपती

35. अमेरिकेतील कोणत्या फाउंडेशनच्या आर्थिक सहाय्यामुळे तुलनात्मक लोकप्रशासनाला 'सुगीचे दिवस' आले?
a) फोर्ड
b) फोर्ब्ज
c) बिल गेट्स
d) जमशेदजी टाटा

36. लोकप्रशासनाच्या पर्यावरणाविषयी कोणत्या लेखकाने लिखाण केले आहे?
a) जॉन गॉस
b) वुड्रो विल्सन
c) चार्ल्स बॉबिल
d) एफ्. डब्ल्यू. टेलर

37. नागरिकांची सनद प्रशासनाची कार्यक्षमता ____.
a) वाढवेल असे नाही
b) फरक पडणार नाही
c) कमी होईल असे नाही, तर वाढवेल
d) यापैकी नाही

38. राज्यशास्त्रातील शक्ती सिद्धांत कोणाचा आहे?
a) मॉन्टेक्यू b) रूसो
c) व्होल्टेअर d) नेपोलिअन

39. विकास प्रशासनाची सुरूवात ____ महायुद्धाच्या शेवटी झाली.
a) पहिल्या
b) दुसऱ्या
c) दोन्ही
d) यापैकी नाही

40. सनदी सेवकांच्या नेमणुकीच्या पद्धती सांगा.
a) लूट
b) योग्यता
c) दोन्ही
d) यापैकी नाही

41. English Government and Politics या ग्रंथाचे लेखन कोणी केले?
a) फ्रेडरिक ऑस्टिन
b) डायसी
c) इंगेल्स
d) कार्ल मार्क्स

42. 1853 मध्ये नोकरांची खुल्या पद्धतीने भरती घेण्याचा आग्रह कोणी धरला?
a) मेकॉले b) मिडलटन
c) ग्लॅडस्टोन d) कर्झन

43. स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना किती आरक्षण भारताने दिले आहे?
a) 50%
b) 33%
c) 18%
d) 30%

44. जिल्हा परिषद, पंचायत समिती कोणत्या घटनादुरूस्तीद्वारे अस्तित्वात आल्या?
a) 73
b) 74
c) 93
d) 94

45. नगरपालिका कोणत्या घटनादुरूस्तीद्वारे अस्तित्वात आल्या?
a) 91
b) 90
c) 74
d) 103

46. ग्रामसभेला घटनात्मक स्थान आहे का?
a) होय b) नाही
c) सांगता येत नाही d) यापैकी नाही

47. 'धोरणात्मक कपात' किती रूपयांची असते?
a) ₹ 1 b) ₹ 100
c) मांडलेली रक्कम d) यापैकी नाही

48. 'प्रतिकात्मक कपात' किती रूपयांची असते?
a) ₹ 1000 b) ₹ 100
c) ₹ 500 d) ₹ 10

49. वार्षिक अंदाजपत्रक कोण तयार करते?
a) अर्थ मंत्रालय b) निती आयोग
c) योजना आयोग d) राष्ट्रपती

50. राष्ट्रपद्धतीचा अवलंब केल्याने नोकरभरतीसाठी महत्त्वाची अट कोणती?
a) नागरिकत्व b) वय
c) तांत्रिक ज्ञान d) वैयक्तिक गुण

51. नोकरभरतीचे दोन प्रकार पडतात - i) अंतर्गत, ii) बाह्य. हे विधान-
a) योग्य b) अयोग्य
c) दोन्ही d) दोन्हीही नाही

52. जिल्हाधिकारी हे कोणत्या सेवेतील पद आहे?
a) IPS
b) JRTS
c) IAS
d) Dy. CEO

SECTION - B (गुण : 26)

या विभागात एकूण 26 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे हा विभाग 26 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

1. घटनेच्या कोणत्या कलमाद्वारे केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्थापना झाली आहे?

2. POSDCORB मधील D काय आहे?

3. POSDCORB मधील S काय आहे?

4. व्यवस्थापनेतील भाग्यविधाती म्हणून कोणाला ओळखले जाते?

5. सनदी सेवकांच्या नेमणुकीच्या किती पद्धती आहेत?

6. धोरण निश्चिती करण्याचा अधिकार कोणाला आहे?

7. तात्पुत्या समित्यांना काय म्हणतात?

8. वित्त आयोगाचे कलम सांगा.

9. विधिमंडळाने घेतलेल्या विविध निर्णयांचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार कोणाला आहे?

10. भारतात सगळ्यात नवीन तयार झालेले राज्य कोणते?

11. लाल बहादूरशास्त्री प्रशासन अॅकॅडमी कोठे आहे?

12. सार्वजनिक लेखा समितीत किती सदस्य असतात?

13. अंदाज समितीची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

14. लोकउद्यम समितीत किती सदस्य असतात?

15. जॉन मथाईच्या कारकिर्दीत कोणती समिती स्थापन झाली होती?

16. महालेखापरीक्षकाचे घटनात्मक कलम सांगा.

17. संसदीय समित्यांची संख्या सांगा.

18. भारतात वित्तीय वर्ष कोणते?

19. विवेकपूर्ण निर्णयग्रहण प्रतिमानाबद्दल कोण प्रसिद्ध आहे?

20. POSDCORB ची संकल्पना कोणाची?

21. प्रशासन ही कला आहे, हे कोणाचे म्हणणे आहे?

22. लोकप्रशासनाचा जनक कोणाला म्हटले जाते?

23. लोकप्रशासनाच्या कोणत्याही एका अभिजात विचारवंताचे नाव सांगा.

24. लोकप्रशासनाच्या कोणत्याही एका मानवी गरजांचे (बिहेव्हिअरल थिंकर) विचार करणाऱ्या विचारवंताचे नाव लिहा.

25. लोकप्रशासनाच्या अभिजात (क्लासिकल) विचारवंतांचा काळ कोणता?

26. NPA (New Public Administration) किंवा नवीन लोकप्रशासनाचा उगम कोठे झाला?

SECTION - C (गुण : 28)

हा विभाग दीर्घोत्तरी स्वरूपाचा आहे. या विभागाला 28 गुण आहेत. या विभागाला उणे गुण पद्धत लागू नाही.

कोणतेही चार प्रश्न सोडवा. (प्रत्येकी 7 गुण)

1. माहितीच्या अधिकाराचे फायदे सांगा.

2. भेद स्पष्ट करा- खासगी प्रशासन व लोकप्रशासन.

3. सार्वजनिक महामंडळाचे फायदे सांगा.

4. लोकप्रशासनाबद्दल थोडक्यात माहिती लिहा.

5. लोककल्याणकारी प्रशासनाबद्दल टीपा लिहा.

6. प्रदत्त विधानाचे गुण-दोष लिहा.